ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**प्रा. प्रविन अजबराव उपरे**
सहा. प्रा. राज्यशास्त्र विभाग
कर्मवीर महाविद्यालय मुल, जि. चंद्रपूर

★★★

**सारांश** :– आज जगात सर्वात लोकप्रीय शासन प्रकार म्हणून लोकशाही शासनपद्धतीकडे पाहिले जाते. त्यातच भारतीय घटनाकारांनी लोकशाही हा शासन व्यवस्थेचा एक प्रकार म्हणुन विचार न करता एक जिवन प्रणाली म्हणून लोकशाहीला अग्रक्रम दिले होते. या अनुशंगानेच भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकुन राहावी व तीला अधिक बळकटी प्राप्त होऊन सक्षम होण्याच्या हेतुने भारतीय घटनेत लोकशाहीच्या आधारभूत सरचंनाही निर्माण केल्या गेल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात इथल्या लोकशाहीला वेळोवेळी वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागले आहे. या संकटाचा सामना करतांना भारतीय जनता किंवा देशातील अन्य कोणत्याही घटकांच्या लोकशाही राजकीय व्यवस्थेवरील विश्वासाला आजवर तडा गेला नाही. हे खरे असे असले तरी प्रादेशीकतावाद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, धर्म व जातीचे प्राबल्य, भ्रष्टाचार, व दहशतवाद अशा अनेक प्रश्नांनी भारतीय लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीत आव्हानांची निर्मिती केली आहे. त्यामुळे या आव्हानांना सामोरे जातांना दिर्घकालीन उपाय योजना करूनच लोकशाहीच्या यशस्वीतेची वाटचाल सुकर करता येईल.

**बिजशब्द** :– लोकशाही, सामाजीक बांधीलकी, संविधान, संसदिय शासन पद्धती, केंद्रीकरण, प्रादेशीकतावाद, नैतीकता, असमानता, भ्रष्टाचार, दहशतवाद, प्रजासत्ताक.

**प्रस्तावना** :– जगात सर्वात लोकप्रीय शासनाचा प्रकार म्हणून लोकशाही शासन प्रकाराकडे पाहिले जाते. काही राजकीय विचारवंतानी तर लोकशाही ही केवळ राज्यकारभार चालविण्यापूरती मर्यादीत नाही तर त्यांनी लोक त्यांनी लोकशाहीला जीवन पध्दती म्हणुन संबोधले आहे. न्याय स्वातंत्र्य, समता, व बंधुता ही लोकशाही जीवनपध्दतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाही जीवनपध्दतीत प्रत्येक व्यक्तीला तीच्या स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडवुन आणण्याची संधी मिळवून देण्याची हमी असते. अर्थातच या जीवनपध्द मानले जातात प्रत्येकाला स्वतःसाठी सुखाची धडपड करतांना इतर कोणत्याही व्यक्तीला साधन बनवीता येत नाही असा लोकशाही जीवन पध्दतीचा सर्वसाधाणतः गृहीत धरला जातो. त्यामुळेच लोकशाही हा प्रकार केवळ राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादीत राहत नाही तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक इ. अशा सर्व क्षेत्रात लोकशाहीला स्थान प्राप्त झाले आहे.

**संशोधन पद्धती** :– प्रस्तूत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विष्लेशणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवंलब करण्यात आलेला आहे.

भारतीय घटनाकांराचाही लोकशाही शासनपध्दतीवर पुर्ण विष्वास होता. तरी मात्र त्यांनी शासनव्यवस्थेचा एक प्रकार म्हणून लोकशाहीचा विचार केला नाही तर समाजाच्या निरनिराळया घटकामध्ये सहिष्णूवृत्ती निर्माण होण्यास चालणा देणारी, परस्पराविषयी विश्वास निर्माण करणारी, गरीब – श्रीमंत, सबल – दुर्बल अशा समाज घटकांच्या परस्पर सहकार्याने व सांमजस्याने विकास घडवून आणण्यास साहयभूत ठरणारी, प्रत्येकाला आर्थिक व सामाजिक दृष्टिने विकासाच्या समान संधी मिळवून व त्यातून सुरळीत व निश्चित पध्दतीने जीवन जगण्याची हमी देणारी एक आदर्श व्यवस्था व एक जीवन प्रणाली म्हणून लोकशाहीकडे पाहीले होते. त्यामुळे घटनाकारांनी लोकशाहीच्या सिध्दांत व मुल्यावर विश्वास ठेवूनच त्यांनी या शासन पध्दतीचा भारताच्या उज्वल भवितव्यासाठी स्वीकार केला.

**भारतीय लोकशाही** :– स्वातंत्र्य आंदोलनातील चळवळ व त्या चळवळीतील सर्वच सक्रिय नेते व कार्यकर्त्यांनी आपली सामाजिक बांधीलकी स्पष्ट केली होती. भारतीय घटना समितीतील सदस्यांना सुध्दा स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी लाभल्या कारणात्सव त्यांचीही भूमिका काही वेगळया स्वरूपाची नव्हती. त्यामुळे त्या सर्वांनी लोकशाही शासनव्यवस्थेला मान्यता दिली होती. व्यक्तीचे स्वातंत्र्य व मूलभूत हक्काचे संरक्षण करावयाचे असेल तर लोकशाही ही व्यवस्थेला पर्याय नाही अशी ठाम भूमिका यावेळी त्यांनी घेतली. अर्थातच देशातील सामान्य जनतेला त्याची प्रतिष्ठा जोपासतांनाच उचीत न्याय मिळवून देण्याचे कार्य हे लोकशाही व्यवस्थेत चांगल्याप्रकारे करतांनाच समाजातील तळागाळातील लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणन्याच्या उदात्त हेतुनेच आपल्या घटनाकारांनी लोकशाही पर्यायाची निवड केली.

भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रीकेमध्ये स्पष्ट करण्यात आलेली उद्दीष्टे केवळ लोकशाहीच्याच मार्गाने साध्य करता येईल या विश्वासानेही घटनाकारांनी लोकशाहीला महत्त्व दिलेले आहे. त्याच बरोबर देशात स्थिर शासन निर्माण करण्यासाठी व जनतेद्वारा निवडुन दिलेले प्रतिनिधी हे बेजबाबदारी पध्दतीने वागणार नाही म्हणून केंद्र व घटकराज्य अषा दोन्ही स्तरावर संसदीय शासन पध्दतीचा भारतीय संविधानाने अंगीकार केला. संसदीय शासन पध्दतीमध्ये कायद्याची अमंलबजावणी करणारे कार्यकारी मंडळ हे जनतेने प्रत्यक्ष निवडुन दिलेल्या प्रतिनिधीच्या सभागृहास म्हणजे कायदेमंडळाला उत्तरदायी आणि अंतिमरीत्या जनतेस जबाबदार असते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनस्तरावरून देशातील अनेक ज्वलंत प्रश्नाबरोबरच देशातील गरीबी दुर करणे, अस्पृश्यता नष्ट करणे, यासारखे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक प्रश्न सोडविण्यास प्राथमिकता देणे गरजेचे होते. हे प्रश्न सोडविण्याकरीता कार्यकारी मंडळ व कायदेमंडळाने परस्पर सलोख्याने व सहकार्याने काम करण्याची निकड ही वर्तमान काळाची आवश्यकता होती. स्थिर

शासनाद्वारे नवजात लोकशाही राष्ट्र टिकविण्याकरिताच देशात संसदीय शासन पध्दतीच्या अनोख्या अशा प्रयोगाला सुरूवात झाली. भारतीय संसदेने संमत केलेले कायदे घटनाविरोधी म्हणजेच घटनेतील तरतूदीचा भंग करणारे असल्यास अवैध ठरविण्याचा अधिकार देशातील सर्वोच्च न्यायालयास आहे. यातूनच स्थिर लोकशाही ही अधिक बळकट करण्याचा प्रयत्न हा या संसदीय शासन पध्दतीच्या होण्यात मदत झाली आहे. संसदीय शासनपध्दती बरोबरच भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकुन राहावी व तीला अधिक बळकटी प्राप्त होऊन सक्षम होण्याच्या हेतूने भारतीय घटनेत लोकशाहीच्या आधारभूत संरचनाही निर्माण केल्या गेल्या. यात देशातील निवडणूका हया मुक्त वातावरणात व निःपक्षपाती होण्याकरीता घटनेत संवैधानिक तरतूदी करून स्वतंत्र निवडणूक आयोग निर्माण केला. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून मानल्या गेलेल्या वृत्तपत्रे व प्रसार माध्यमे यांनी आपली कार्य निर्भयपणे करण्यासाठी स्वतंत्र संवैधानिक तरतूदी करण्यात आल्या. त्याचप्रकारे केंद्र राज्य संबध, नागरीकांचे मूलभूत अधिकार, राज्यनितीची मार्गदर्शक तत्वे इ. विशयकही तरतूदी करण्यात आल्या. देषाला लोकषाहीच्या दिर्घकालीन परंपरा नसल्यामूळे या सर्व गोष्टी संविधानात सविस्तर नमूद करणे घटना समितीला गरजेचे वाटले. अशा प्रकारे लोकशाही व्यवस्थेच्या आधारभुत रचना निर्माण करणाऱ्या संविधानिक तरतूदीमूळे भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था टिकून राहण्यास मदत झाली आहे. भारतीय संविधानाद्वारे इथल्या लोकशाहीला अधिक सक्षम, बळकट करण्यासाठी संविधानिक तरतूदिच्या माध्यमातून व्यवस्था करतांनाच 73 व्या व 74 व्या घटना दुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थाना मिळालेला घटनात्मक दर्जा हे लोकशाहीच्या रक्षणासाठी उचलण्यात आलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणता येईल. अत्याधीक सत्तेच्या केंद्रीकरणामुळे राज्यकर्त्यांच्या अंगी हूकूमषाही प्रवष्त्ती एकवटत असते. ते लोकशाहीच्या दृष्टिने धोक्याची घंटा असते. व त्यातूनच एकाधीकारशाहीकडे वळण्याचा धोका संभवतो. त्यामुळे लोकशाही सूध्दा धोक्यात येण्याची भीती असते. त्यातुनच लोकशाहीच्या सुरक्षिततेसाठी राज्यकर्त्यावर काही प्रमाणात बंधने म्हणून ज्या मार्गाचा अवलंब केला जातो त्यात प्रभावी मार्ग म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय. स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादीत प्रमाणात का असेना मात्र अधिकार देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण घडवुन आणणे म्हणजेच लोकशाही विकेंद्रीकरण होय. या विकेंद्रीकरणामुळे एकप्रकारे भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली अनुकुल परिस्थिती तयार होण्यास मदत झाली आहे. लोकशाही हा एक शासनाचा प्रकार म्हणून भारतीय लोकशाहीचा विचार केला तर भारतात या शासन प्रणालीचा अंमल झाल्यापासुन तर आजच्या स्थितीलाही ती स्थिरावल्याचे दिसते. आज देशाला स्वातंत्र्य मिळुन 73 वर्षापेक्षा अधिकचा व संविधान अंमलात आल्यापासून 71 वर्षाचा कालावधी लोटला आहे. देशाचा प्रंचड आकार, विशाल जनसमूदाय व देशातील एकूण परिस्थितीचा आढावा घेतला तर असे निदर्शनास येते की, एवढया वर्षात भारतीय प्रजासत्ताकांची वाटचाल एका ठराविक व योग्य दिशेनेच चालू आहे. या कालावधीतही भारतीय प्रजासत्ताकाला अनेक कसोटीच्या क्षणाचा अनुभव घ्यावा लागलेला आहे. मात्र भारतीय मतदार, राजकीय संस्था, राजकीय पक्ष व राजकीय नेतृत्व या सर्वांनिच या कसोटीवर खरे उतरत वेळोवेळी आपली क्षमता सिध्द करून भारतीय लोकशाहीला अधिक मजबुती प्रदान करण्याचे कार्य केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळातही भारतीय लोकशाहीला इथल्या वेळोवेळी व वेगवेगळया संकटाला सामोरे जावे लागले आहे. मात्र या संकटाला धैर्याने समोर जाऊन व त्या संकटांचा यशस्वी सामना करून भारतीय लोकशाहीने आपल्या बळकटीचे, सक्षमतेचे व पर्यायाने सामर्थ्याचे दर्शन घडवून एका परिपक्व लोकशाहीचे दर्शन जगाला घडवून दिलेले आहे. यात चीन व पाकीस्तान या दोन देशाबरोबर झालेली युध्दे असोत वा देशातंर्गत लादण्यात आलेली आणीबाणी असो मात्र या दोन्ही संकटात भारतीय लोकशाहीला कोणत्याही प्रकारचा धक्का लागला नाही. इ. स. 1962 च्या चीनी आक्रमनाच्या वेळी तर आपल्या प्रजासत्ताकाची एक प्रकारे कसोटीच लागली होती. इ. स. 1975 ते 1977 या काळातील आणीबाणीने राजकीय सत्ता आपल्या हाती एकवटण्याचा प्रयत्नच झालेला होता. त्यामुळे नागरीकांचे लोकशाही हक्क सुध्दा धोक्यात आले होते. मात्र 1977 मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रीक निवडणुकीमध्ये एकहाती सत्ता एकवटणाऱ्या व लोकशाही ध ोक्यात आणण्याऱ्या कॉंग्रेस पक्षाला इथल्या जनतेने मतदानाद्वारे पायउतार होण्यास भाग पाडले

**भारतीय लोकशाहीपूढील आवाहने** :— या प्रकारे देशातील वेगवेगळया घटना प्रंसगामुळे भारतीय लोकशाहीला अनेक संकटाला तोंड द्यावे लागले आहे तरी भारतीय जनता किंवा देशातील अण्य कोणत्याही घटकाच्या लोकशाही राजकीय व्यवस्थेवरील लोकशाहीपूढे विविध प्रकारची आवाहने उभी टाकली आहेत त्याचा विमर्श पुढीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण** :— नियमित व ठरावीक कालावधीमध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूका हे लोकशाहीचे एक महत्वाचे वैशीष्टये मानले जाते. शांततामय मार्गाने सत्तांतर घडवुन आणण्याचे मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पडणाऱ्या निवडणुकांचे वर्णन केले जाते. मात्र भारतात अलिकडच्या काळात निवडणुका हया अती खर्चीक होऊन यात काळया पैशाचे प्रश्न वाढत आहे. निवडणूक जिंकण्या करिता पक्षामध्ये व उमेदवारामध्ये स्पर्धा निर्माण होऊन सत्तेचे राजकारण खेळणारे नेते विरोधकाला संपविण्यासाठी भाडोत्री गुंडाना हाताशी धरतात. अशातच निवडणुकीच्या काळात मतदारांना धाक दाखविणे, उमेदवार पळविणे. कोंडुन ठेवणे, मतदान केंद्रे बळकाविणे, मतपेटया पळविणे यासारख्या गैरप्रकाराचा अवंलब होत असल्यामूळे राजकारणात गुन्हेगारीचे प्रमाण वाढुन ते लोकशाहीला आवाहन ठरत आहे.

**प्रादेशीकतावाद** :— राज्यघटना निर्मितीची प्रक्रीया सुरू झाल्यापासून भाषेच्या आधारावर इथल्या घटक राज्याची निर्मिती झाल्यानंतर सुध्दा प्रादेशीकतेचा प्रश्न अजुनही सुटलेला नाही. देशातील विविध घटक राज्यांना व त्यातील भागांना स्वतःचे वेगळेपण हवे असतांनाच सामाजिक, सांस्कृतीक वेगळेपणाची जगाला ओळख करून देण्याच्या चळवळी

सुरू आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध आधारावर काही राज्यांना आपल्यावर अन्याय होत आहे. या भावनेतून स्वतंत्र सार्वभौम राज्याची मागणी पूढे येत आहे. प्रादेशीक पक्षातील प्रांताभीमान तसेच धर्मातील प्रखरता अशा अनेक कारंणामुळे राज्यातून फुटून निघण्याची भाषा वापरली जाते. वांषिक अस्मिता, विकासाचा प्रादेशीक असमतोल, अन्य प्रांतीयाना विरोध करणारी भूमिपुत्रवादाची भाशा यातून प्रादेशिकतावादाचा उदय झाला असून या प्रादेशिकतावादाने लोकशाहीसमोर अनेक प्रश्न निर्माण केली आहेत.

**राजकारणातील धर्म व जातीचे प्रस्थ :–** देशात विविध जाती, धर्म, संस्कृती, भाषा इ. बाबतीत असलेल्या विविधतेचा विचार करून या घटकाला अखंडता निर्माण करण्यासाठी व भारतीय समाजात एकात्मता वाढीसाठी धर्मनिरपेक्षता तत्वाचा स्वीकार करण्यात आला तर अस्पृश्यता निर्मुलनाकरिता अस्पृश्यता पालनावर कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. असे असतांनाही अनेक राजकीय पक्ष व संघटना या विविधतेचा संधी म्हणून वापर करून स्वतःचे मतलबी राजकारण करतात. सत्ताप्राप्तीचा एक भाग समजुन ते धार्मिक व जातीय शक्तींना खतपाणी घालून मानवी जीवनाशी कुर खेळ करीत आहेत. वास्तविक पाहता एकजीन्सी व एकात्म समाजावर लोकशाहीचे भवीतव्य अवंलबून असते. मात्र दुदैवाने भारतीय समाजात हेतूपुरस्सर जातीय व धार्मीक फुटीरता निर्माण करण्याचा प्रयत्न शासकीय मंडळी किंवा स्वतःला समाजसुध ाारक म्हनणाऱ्याकडुन होतांना दिसतो. यामूळे अल्पसंख्याक वर्गातील लोकांच्या मनात असुरक्षीततेची भावना निर्माण होऊन लोकषाही व्यवस्थेवर आघात होत असतो.

**राजकारणातील नैतीकतेचा ऱ्हास :–** म. गांधी यांनी साध्याप्रमाणे साधनांच्या पवित्र्यावरही जोर देत राजकारणातील नैतीक अधिष्टापनांचे महत्त्व प्रतिपादन केले होते. मात्र सध्याच्या राजकारणात सत्ता प्राप्तीसमोर नैतीक अधिष्ठानाला गौण स्थान प्राप्त झालेले दिसते. प्रामाणीकपणा, त्याग, वैचारिक निष्ठा, सामाजिक बांधीलकी, शुध्द चारित्र्य इ. महत्त्वपुर्ण बांबीना राजकारणात जागा उरलेली नाही. जनतेचे प्रश्न सोडविण्यात येत असलेल्या प्रातीनिधीक सभागुहाचे पावित्र्य राखणाऱ्या ऐवजी सभागुहात गोंधळ घालणाऱ्या उमेदवारालाच राजकीय पक्ष अधीक प्राधान्य देतात. सदस्यांचे बेषिस्त वर्तन ही एक प्रकारे लोकशाहीला लागलेली कीड आहे.

**स्त्री – पुरूष असमानता :–** भारतीय समाजातील पुरूषी वर्चस्वाच्या मानसिकतेमुळे सुरूवाती पासुनच स्त्रीयांना नेहमीच प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान देण्यात आले आहे. ही पुरूषी मानसीकता आधुनिक युगातही पुर्णपणे संपलेली दिसत नाही. भारतीय घटनेने सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. क्षेत्रामध्ये दर्जा आणि संधीच्या दृष्टिने स्त्री – पुरुश यांच्यात समानता प्रस्थापित करून धर्म, वंश, जात, भाषा, संस्कृती इ. च्या आधारावर भेदभाव करण्यास कायद्याने बंदी घातलेली आहे. त्यातच शासनानेही महिला सबली करणावर विशेष भर दिलेला आहे. मात्र असे असतांनाही अनेक क्षेत्रात स्त्रीयांच्या हक्कांना डावलेले जाऊन त्यांच्या संधीला नाकारले जाते. त्यामुळे लोकशाहीच्या दृष्टिने समाजाचा निम्मा हिस्सा असलेल्या स्त्री घटकावर अण्याय होत असतो. याचा परिणाम हा न्याय स्वातंत्र्य समता या तत्वावर उभी असलेली लोकशाही व्यवस्थेला तडा जात असतांना दिसते.

**भ्रष्टाचार व दहशतवाद :–** देशातील राजकारणी व नोकरशाही यांच्यातील अभद्र यूती हे देषातील भ्रष्टाचाराचे मुख्य उगमस्थान आहे. एकीकडे सत्ताप्राप्तीसाठी निवडणुकीत अमाप पैसा खर्च करायचा व दूसरीकडे निवडुन आल्यावर तो विविध मार्गानी वसूल करायचा ही बाब आता नवीन राहीलेली नाही. मात्र याचा परिणाम हा सरसकट तळागाळातील लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमावर होऊन सामान्य मानसाला विकासापासून वंचीत ठेवण्यावर होत असतो. त्यातच मुठभर दहशतवादी हे मताचा राजकारण करणाऱ्याच्या पाठीब्यांवर देशात घातपातीत हिसंक कारवाया करून अराजकतेचे वातावरण निर्माण करीत असतात. या कार्यामूळेच देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात येत असते. अर्थातच भ्रष्टाचार हा देशाला आतून खिळखीळे करीत असतांना दहशतवाद हा बाहेरून हादरे देत असतो. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेलाही जबर धक्के पोहचत असतात.

**मूल्यमापन :–** देशात निर्माण झालेल्या अस्मानी व सुलतानी संकटाला यशस्वीरीत्या प्रत्युत्तर देत भारतीय लोकशाही आपल्या समर्थपणाचे दर्शन जगाला नेहमीच दिलेले आहे. देशातील अलीकडील काही वर्षाच्या काळातील काही घडामोडी पाहता आपल्या प्रजासत्ताकाला व येथील लोकशाहीला यापुढेही अनेक आवाहनाचा सामना करावा लागणार हे निश्चित आहे. देशातील सामान्याचे हित जोपासतांनाच त्यांच्या मूलभूत गरजांची पुर्तता करणे, कुपोषण व भुकबळीची आकडेवारी कमी करणे किंबहुना त्यावर मात करणे, देशातील दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमतेची दरी कमी करणे व त्यातच जगभरातील तांत्रिक व आर्थिक दृष्टया समध्द असलेल्या देशांशी स्पर्धा करून आपले स्थान निर्माण करण्याचे आवाहन भारतीय लोकशाहीला पेलावे लागणार आहे. ही आवाहने यशस्वीरीत्या पेलल्यास देशात लोकशाही स्थीरावतांनाच ती अधिक बळकट व सक्षम होऊन जगातील इतर लोकशाही देशानांही मार्गदर्शनाचे कार्य करील हे निश्चित.

***संदर्भ :–***

- *व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित), 2010, भारतीय लोकशाही – अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे.*
- *लोटे रा. ज., 2009, भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर.*
- *सांबळे आर. डी., 2004, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लीकशींग हाऊस, नागपूर.*
- *फाडिया बी. एल., 2006, राजनीती विज्ञान, प्रतियोगीता साहित्य सिरिज, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.*
- *पळशीकर सुहास, 2004, समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन, पुणे.*